जा.क्र. का.१५/वामुद/सर्वसाधारण सूचना/ ६८२
नवीन प्रशासकीय इमारत,
तळमजला, विधानभवनासमोर,
पुणे -४११ ००१.
दि. २५.११.२०१३.

**परिपत्रक**

**विषय :-** मुंबई शहर व उपनगरांकरिता लागू असलेली मार्गदर्शक सूचना क्र.२ (२.१ व २.२) चे स्पष्टीकरणाबाबत.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. का.१५/वामुद/सर्वसाधारण सूचना/६४३, दि.७.११.२०१३.

उपरोक्त विषयाबाबत निर्गमित केलेल्या स्पष्टीकरणात्मक सूचनेच्या अनुषंगाने काही निवेदने या कार्यालयास प्राप्त झाली असून मुंबई शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.३३(५) अन्वये आणि उपनगरातील अस्तित्वातील इमारतींचा टीडीआर वापरुन पुर्नविकास करण्याच्या प्रस्तावावर अस्तित्वातील इमारतीमध्ये वापरलेल्या विद्यमान क्षेत्रावर Fungible FSI हा प्रिमिअम न आकारता अनुज्ञेय असल्याने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

“मुंबई शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.३३(५) अन्वये आणि उपनगरातील अस्तित्वातील इमारतींचा TDR वापरुन पुर्नविकास केलेल्या प्रस्तावामध्ये अस्तित्वातील इमारतीच्या वापरलेल्या चटई क्षेत्र निर्देशांकावर Fungible FSI हा प्रिमिअम न आकारता अनुज्ञेय असलेने अशा प्रकरणी दि.७/११/२०१३ चे परिपत्रकातील सूचना क्र.२ व उदाहरणामध्ये नमूद केलेप्रमाणे Fungible FSI साठी प्रिमिअमच्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क आकारणी करु नये.”

सही/-
(एस. चोक्कलिंगम्)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी,

१) सहसंचालक, नगर रचना, मूल्यांकन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) उपसंचालक नगर रचना, मुंबई प्रदेश, मूल्यांकन, मुंबई.
३) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई

/- सदर परिपत्रकाची प्रत आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांना पुरविण्यात यावी.

प्रत :- कार्यासन अधिकारी (नोंदणी महानिरीक्षक कार्यालय) क्र. ४, ६, ८, १०, ११, १२, १४, १६.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकरिता